गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिव कार्यालय
आवक क्र. 2908 दि. 31/3/23

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय

**बस स्टँड समोर**, धानोरा रोड गडचिरोली पीन- 442 605

दुरध्वनी क्र. 07132- 233015 Email ID : sdogad.gadchiroli@gmail.com

क्रमांक : कार्या/भुसंपादन/अ.का./कावि/११२ /2023 दिनांक : 29 /03/2023

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
अभियांत्रिकी विभाग
आवक क्र. 2143 दि. 31/3/2023
आवक क्र. 409 दि. 31/3/2023

प्रति,

1. उपजिल्हाधिकारी, भुसंपादन (सा.)
   जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली
2. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ,
   गडचिरोली.
3. तहसिलदार, गडचिरोली
4. तलाठी, अडपल्ली, सा. क्र. 04 तह.गडचिरोली.
5. सरपंच /सचिव, ग्रामपंचयात अडपल्ली.

**विषय** :- गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली करीता मौजा- अडपल्ली येथिल खाजगी जमिन भुसंपादन प्रकरणात न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, 2013 चे **कलम 21 अन्वये नोटीस प्रसिध्द करणेबात.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली करीता मौजा- अडपल्ली येथील खाजगी जमिन भुमी संपादन पुर्नवसन व पुर्नवसाहत पारदशकतेचा हक्क अधिनियम 2013 नुसार भुसंपादन करण्याबाबतचे प्रकरणात कलम 19 (1) अन्वये अधिसुचना दिनांक 29/03/2023 प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार प्रकरणात कलम 21 अन्वये जाहीर नोटीस स्थानिक पातळीवर/कार्यालयीन नोटिस बोर्ड / जिल्हयाचे संकेतस्थळावर व इतर आवश्यक ठिकाणी प्रसिध्द करण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत. त्यानुसार प्रकरणात कलम 21 अन्वये जाहीर नोटीस निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर नोटीस आपण आपले अधिनिस्त असलेल्या कार्यालयीन नोटिस बोर्ड / संकेतस्थावर प्रसिध्द करुन त्याबाबतचा प्रसिध्दी अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा. यासमवेत उक्त जाहीर नोटीस संलग्णीत करण्यात येत आहे.

सहपत्र :- कलम 21 ची नोटीस.

विशेष भुसंपादन अधिकारी, तथा
उपविभागीय अधिकारी, गडचिरोली.

अभियांत्रिकी विभाग

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

31/3/2023

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय

**बस स्टॅंड समोर, धानोरा रोड गडचिरोली पीन- 442 605**

दुरध्वनी क्र. 07132- 233015 Email ID : sdogad.gadchiroli@gmail.com

क्रमांक : कार्या/शिरस्तेदार/कावि/७११ /2023 दिनांक : २१ /03/2023

प्रकरण क्र. 01/एल.ए-65/2022-23
मौजा- अडपल्ली, ता. जि. गडचिरोली

**भुमीसंपादन पुनर्वसन व पुर्नरस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याबबतचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 कलम 21 चे 1 अन्वये**

## जाहीर नोटीस

समुचित शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम 19 खालील अधिसुचना या कार्यालयामार्फत दिनांक 29/03/2023 रोजी निर्गमित करुन स्थानिक पातळीवर प्रसिध्द केली आहे.

आणि अधिसुचनेप्रमाणे अधिसुचित केलेले परिशिष्ट मधील जमीन भुसंपादन प्रकरण क्रमांक- 1/एल-65-2022-23 मौजा- अडपल्ली तालुका + जिल्हा- गडचिरोली येथील खाजगी जमीन गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली करीता उक्त अधिनियमाच्या कलम 19 (1) अन्वये अधिसुचित केल्याप्रमाणे सदर जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे.

आपण उपरोक्त अधिसुचित जमिनीमध्ये हितसंबंधीत व्यक्ती असल्यास आपणास जाहिररित्या कळविण्यात येते की, सदर भुसंपादनाबाबत खालील मुद्यावर कोणतेही आक्षेप असल्यास आपण स्वत: अभिकर्त्या मार्फत किंवा वकीलामार्फत खालील सही करणार उपविभागीय अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत ही नोटीस निर्गमित झाल्यानंतर दिनांक-28/04/2023 रोजी पर्यंत खालील मुद्यावर आपला लेखी आक्षेप/दावा दाखल करावा.

अ) सदर जमीनीत असलेल्या आपल्या हितसंबधाचे स्वरूप.
आ) सदर हितसंबधाच्या अनुषंगाने आपण मागणी करत असलेला नुकसान भरपाईचा दावा.
इ) पुनर्वसन व पुनर्वसहतबाबत आपण करीत असलेली मागणी
ई) कलम 20 अन्वये केलेल्या जमीनीच्या मोजमाप बाबत काही आक्षेप असल्यास.
उ) सदर हितसंबधाच्या अनुषगाने संपादीत होत असलेल्या आणि ताब्यात घेतल्या जाणार असलेल्या जमिनीचा तपशिल खालिलप्रमाणे,

विशेष भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गडचिरोली
सत्यमेव जयते

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक | गांव | तालुका | जिल्हा | गट क्र./सर्वे क्र. | संपादन करावयाचे क्षेत्र | भुधारकाचे नाव | भुसंपादनाचा उद्येश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रकरण क्र. 01/एल.ए-65/2022-23 | अडपल्ली | गडचिरोली | गडचिरोली | 152/1 | 1.39 | लिलाबाई भोजु पाल व इतर | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली चे भौतिक व क्षैक्षणिक विकासा करीता |
| 2 | | | | | 238 | 1.05 | दिवाकर मोतीराम राउत व इतर | |
| 3 | | | | | 256/3 | 1.20 | रमेश जोगा वनकर व इतर | |
| | | | | एकुण | 3 | 3.64 | | |

असेही सुचित करण्यात येते की, उपरोक्त मुद्याचे अनुषंगाने आपला दावा लेखी स्वरुपात असावा आणि आपण किंवा आपले अधिकृत यांनी स्वत: स्वाक्षरीत केलेला असावा.

ठिकाण- गडचिरोली
दिनांक- 29 /03/2023

(डॉ. मैनक घोष, भा.प्र.से.)
विशेष भुसंपादन अधिकारी, तथा
उपविभागीय अधिकारी, गडचिरोली.